पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.महिला व बालकल्याण समिती ( विशेष सभा )**

कार्यपत्रिका क्रमांक - १

**सभावृत्तांत**

दिनांक - **१५/०४/२०१७** वेळ - दुपारी **१२.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.महिला व बालकल्याण समितीची पहिली सभा (विशेष सभा) शनिवार दिनांक **१५/०४/२०१७** रोजी दुपारी **१२.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस **मा.श्री.सुनिल पाटील, (भा.प्र.से.)** संचालक, संचालनालय, भूजल सर्व्हेक्षण आणि विकास यंत्रणा, पुणे व खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.आंगोळकर सागर सुनिल
२. मा.वैशाली ज्ञानदेव घोडेकर
३. मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे
४. मा.सुनिता हेमंत तापकीर
५. मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे
६. मा.लोखंडे चंदा राजू
७. मा.सुलक्षणा राजू धर
८. मा.कदम निकीता अर्जुन
९. मा.दर्शले रेखा राजेश

या शिवाय मा.डोईफोडे – सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.लावंड – कायदा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**मा.पिठासीन प्राधिकारी तथा संचालक, संचालनालय, भूजल सर्व्हेक्षण आणि विकास यंत्रणा** – सन्मा.सदस्य, उपस्थित सर्व अधिकारी यांचे स्वागत करतो. आजच्या विशेष सभेत मा.महिला व बालकल्याण समितीचे सभापती पदावर नेमणूक करणेचा विषय आहे. त्यासाठी मा.विभागीय आयुक्त यांनी सभेचा पिठासीन प्राधिकारी म्हणून माझी या ठिकाणी नेमणुक केलेली आहे.

मुक्त व निर्भयपणे मा. महिला व बालकल्याण समितीच्या सभापती पदाची निवडणुक पार पाडण्यासाठी कामकाजाची लेखी नोंद घेण्याबरोबरच त्या कामकाजाची व्हिडिओ चित्रणाद्वारे देखील नोंद घेण्याची व्यवस्था ठेवणेत आलेली आहे.

**मी नगरसचिव यांना सभेचे कामकाज सुरु करण्याचे आदेश देतो.**

(मा.सभापती, महिला व बालकल्याण समिती यांची निवड करण्यासाठी कार्यपध्दतीची माहिती देण्यात आली)

**मा.नगरसचिव -** मा. महिला व बालकल्याण समितीचे सभापती पदावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ३० (३) नुसार नेमणूक करणे.

मा.महिला व बालकल्याण समिती सभापती पदाकरीता मुदतीत दाखल झालेली दोन उमेदवारांची नामनिर्देशनपत्रे मा.पिठासीन प्राधिकारी यांचेकडे सुपुर्त करण्यात येत आहेत.

**मा.पिठासीन प्राधिकारी तथा संचालक, संचालनालय, भूजल सर्व्हेक्षण आणि विकास यंत्रणा** - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सभापती, महिला व बालकल्याण समिती पदाकरीता दोन नामनिर्देशनपत्रे मुदतीत दाखल झाली आहेत. त्यामध्ये उमेदवार त्यांचे सुचक, अनुमोदक यांची नावे पुढील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | उमेदवाराचे नांव | सुचकाचे नांव | अनुमोदकाचे नांव |
|---|---|---|---|
| ०१ | मा.सुनिता हेमंत तापकीर | मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे | मा.लोखंडे चंदा राजू |
| ०२ | मा.कदम निकीता अर्जुन | मा.सुलक्षणा राजू धर | मा.वैशाली ज्ञानदेव घोडेकर |

( या नंतर या नामनिर्देशन पत्रांवर उपस्थित सदस्यांना काही आक्षेप असल्यास त्यासाठी वेळ देण्यात आला.)

मा.सभापती, महिला व बालकल्याण समितीचे पदासाठी मुदतीत प्राप्त झालेल्या उमेदवारांच्या उपरोक्त दोन नामनिर्देशन पत्रांची छाननी करणेत आली असून ती दोनही नामनिर्देशनपत्रे वैध ठरलेली आहेत. त्यामध्ये महिला व बालकल्याण समिती सभापती पदाची निवडणूक लढविणा-या **मा.सुनिता हेमंत तापकीर व मा.कदम निकीता अर्जुन** ह्या दोन रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार आहेत.

उमेदवारास १५ मिनिटांच्या आत त्यांनी सही केलेली लेखी नोटीस मा.पिठासीन प्राधिकारी यांजकडे देऊन त्यांची उमेदवारी मागे घेता येईल अशी कायद्यात तरतूद आहे. त्यानुसार १५ मिनिटांचा अवधी देण्यात येत आहे.

( मा.पिठासीन प्राधिकारी यांनी उमेदवारी मागे घेणेसाठी दिलेला दुपारी १२.०५ ते १२.२० हा १५ मिनिटांचा कालावधी संपला.)

उमेदवारी मागे घेणेसाठी दिलेल्या १५ मिनिटांच्या अवधीमध्ये **मा.कदम निकीता अर्जुन** यांनी लेखी सुचना देऊन त्यांची सभापती, महिला व बालकल्याण समिती पदासाठीची

उमेदवारी मागे घेतली असल्यामुळे मा.सभापती, महिला व बालकल्याण समिती पदाची निवडणूक लढविणा-या **मा.सुनिता हेमंत तापकीर** ह्या एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार असल्याने **मा.सुनिता हेमंत तापकीर** यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण समितीचे सभापती पदावर रितसर वैधरित्या बिनविरोध निवड झाल्याचे जाहीर करण्यात येत आहे.

----------

ठराव क्रमांक - १ विषय क्रमांक - १

दिनांक - १५/०४/२०१७ विभाग - नगरसचिव

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.महिला व बालकल्याण समिती सभापती पदासाठी मुदतीत दाखल झालेल्या व वैध ठरलेल्या दोन नामनिर्देशन पत्रांमधील मा.महिला व बालकल्याण समिती सभापती पदाची निवडणूक लढविणा-या **मा.कदम निकीता अर्जुन** यांनी लेखी सुचना देऊन त्यांची सभापती, महिला व बालकल्याण समिती पदासाठीची उमेदवारी मागे घेतली असल्यामुळे मा.महिला व बालकल्याण समिती सभापती पदाची निवडणुक लढविणा-या **मा.सुनिता हेमंत तापकीर** या एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार असल्याने **मा.सुनिता हेमंत तापकीर** यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या **महिला व बालकल्याण समितीचे सभापती पदावर** रितसर वैधरित्या बिनविरोध निवड झाल्याचे जाहिर करणेत येत आहे.

---------

**सही/-**

**( सुनिल पाटील )**

पिठासीन प्राधिकारी तथा
संचालक, संचालनालय,
भूजल सर्व्हेक्षण आणि विकास यंत्रणा
महिला व बालकल्याण समिती (विशेष सभा)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

----------

( नवनिर्वाचित सभापती **मा. मा.सुनिता हेमंत तापकीर** यांनी सभेचे अध्यक्षस्थान स्विकारले. )

**मा.नगरसचिव** - विषय क्र.२ - मा.महिला व बालकल्याण समिती उपसभापतीची नेमणूक करणे.

मा.महिला व बालकल्याण समितीचे उपसभापती पदासाठी मुदतीत दाखल झालेले एक नामनिर्देशनपत्र मा.सभापती यांचेकडे सुपुर्द करणेत येत आहे.

**मा.सभापती** - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या उपसभापती, महिला व बालकल्याण समिती पदाकरीता एकच नामनिर्देशनपत्र मुदतीत दाखल झाले आहे. त्यामध्ये उमेदवार त्यांचे सुचक, अनुमोदक यांची नावे पुढील प्रमाणे आहेत.

| **अ.क्र.** | **उमेदवाराचे नांव** | **सुचकाचे नांव** | **अनुमोदकाचे नांव** |
|---|---|---|---|
| **०१** | **मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे** | **मा.लोखंडे चंदा राजू** | **मा.आंगोळकर सागर सुनिल** |

( या नंतर या नामनिर्देशन पत्रांवर उपस्थित सदस्यांना काही आक्षेप असल्यास त्यासाठी वेळ देण्यात आला.)

मा.उपसभापती, महिला व बालकल्याण समितीचे पदासाठी मुदतीत प्राप्त झालेल्या उपरोक्त एक नामनिर्देशन पत्राची छाननी करणेत आली असून ते नामनिर्देशनपत्र वैध ठरले आहे. त्यामध्ये मा.महिला व बालकल्याण समिती उपसभापती पदाची निवडणूक लढविणा-या **मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे** या एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार आहेत.

( उमेदवारास १५ मिनिटांच्या आत त्यांनी सही केलेली लेखी नोटीस मा.सभापती यांजकडे देऊन त्यांची उमेदवारी मागे घेता येईल अशी कायद्यात तरतूद आहे. उमेदवारी मागे घेण्यासाठी कालावधी देणेबाबत विचारणा केली असता उपस्थित सन्मा.सदस्यांनी एकच नामनिर्देशन पत्र असल्याने उमेदवारी मागे घेण्यासाठी कालावधी न देता पुढील कार्यवाही करणेबाबत सुचविले.)

मा.उपसभापती, महिला व बालकल्याण समिती पदाची निवडणूक लढविणा-या **मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे** या एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार असल्याने **मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे** यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण समितीचे उपसभापती पदावर रितसर वैधरित्या बिनविरोध निवड झाल्याचे जाहीर करण्यात येत आहे.

----------

ठराव क्रमांक - २ विषय क्रमांक - २

दिनांक - १५/०४/२०१७ विभाग – नगरसचिव

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.महिला व बालकल्याण समिती उपसभापती पदासाठी मुदतीत दाखल झालेल्या व वैध ठरलेल्या एक नामनिर्देशन पत्रामधील मा.महिला व बालकल्याण समिती उपसभापती पदाची निवडणूक लढविणा-या **मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे** या एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार असल्याने **मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे** यांची

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या **महिला व बालकल्याण समितीचे उपसभापती पदावर** रितसर वैधरित्या बिनविरोध निवड झाल्याचे जाहिर करणेत येत आहे.

----------

ठराव क्रमांक - ०३ विषय क्रमांक - ०३

दिनांक - १५/०४/२०१७

सुचक : मा.योगीता नागरगोजे अनुमोदक : मा.सोनाली गव्हाणे

मा.महिला व बालकल्याण समितीची सभा प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिस-या मंगळवारी दुपारी ३.०० वा. विशेष समिती सभागृहात भरविण्यात यावी. तथापी सदर दिवशी कार्यालयास सुट्टी/सुट्टया असलेस त्या सुट्टी / सुट्टयांनंतर येणारे कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी दुपारी ३.०० वा. सभा भरविण्यात यावी. तसेच कोणीही सन्मा.सदस्य उपस्थित नसल्याने होऊ न शकणारी सभा मा.सभापती निश्चित करतील त्या दिवशी व त्या वेळी भरविण्यात यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(मा.सुनिता हेमंत तापकीर)**
**सभापती**
महिला व बालकल्याण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/७२८/२०१७
दिनांक : १५/०४/२०१७



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.